REGISTERED No. B. 3434




# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ३१ जुलै १९४६ अंक ३१

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

——साठे बिस्किट कं., पुणें २

आंध्र खादीचे ( म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे )
—एकमेव विक्रेते—


खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात.




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा




पुणें चीफ एजंट्सः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.




रोग जंतू नाशक व हवा शुद्धि कारक
आरोग्य
निलगिरी
तेल वापरा
एरंडोल एजन्सी
लक्ष्मी एजन्सी
मुंबई २४

## विविध माहिती

**ॲटॉमिक शक्तीचा अभ्यास**—ॲटॉमिक शक्तीचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेनें तीन मोठ्या प्रयोगशाला स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रयोगशालांतील अभ्यासानंतर शास्त्रज्ञ परत आपल्या संस्थांत जाऊन ॲटॉमिक शक्तीचा उद्योगधंदे, वैद्यकी, प्राणिशास्त्र, इत्यादींत तिचा उपयोग कसा करतां येईल ह्याचा अभ्यास पुढें चालवतील.

**पेट्रोल रेशनिंगबाबत महत्त्वाचा निर्णय**—"एकाद्याच्या मालकीच्या मोटार लॉन्या व मोटारी, दोन्ही असल्या तर एकाची पेट्रोल कुपन्स दुसऱ्यासाठी वापरूं नयेत असें मोटर स्पिरिट रेशनिंग ऑर्डर कोठेंहि म्हणत नाहीं. रेशनिंग ऑर्डरनें सर्व गाड्यांची विभागणी (१) मोटार व्हेइकल्स व (२) मोटार बोट्स ह्यांमध्यें केली आहे आणि ह्यांपैकीं एकाचीं पेट्रोल कुपन्स दुसऱ्यासाठीं वापरतां कामा नयेत, असा त्या ऑर्डरचा अर्थ आहे. मोटार लॉन्या व मोटारी ह्यांचिमध्यें फरक करण्यांत आलेला नाहीं." असा मुंबई हायकोर्टानें एका ताज्या प्रकरणांत अभिप्राय व्यक्त केला आहे.

**कर्जमंजुरीनंतर दोन तासांत कर्जाची मागणी**—प्रेसिडेंट ट्रुमन ह्यांनीं अँग्लो-अमेरिकन कर्जाच्या करारावर सही केल्यानंतर दोन-तीन तासांचे आंतच ब्रिटिश सरकारनें ३० कोटि डॉलर्सच्या कर्जाची अमेरिकन सरकारकडे मागणी केली. ही रकम न्यूयार्क फेडरल रिझर्व बँकेमार्फत ग्रेट ब्रिटनला उपलब्ध करून देण्यांत आली आहे.

**अमेरिकेचा कोळसा युरोपकडे**—अमेरिकेनें जून, १९४६ मध्यें युरोपकडे व उत्तर आफ्रिकेकडे १०३/४ लक्ष टन कोळसा पाठवला. एकट्या फ्रान्समध्यें ३ लाखांपेक्षां ज्यास्त टन कोळसा उतरला.

**ब्रम्ही नोटा**—ब्रम्ही नोटांची मोड देण्यास हिंदी रिझर्व बँक बांधलेली नाहीं, फक्त त्या सरकारची एजंट म्हणून तें काम बँक करील, ह्या गोष्टीस कायदेशीरपणा देणारा करन्सी नोट्स ॲक्ट ब्रम्हदेशाच्या गव्हर्नरानें जाहीर केला आहे. एक हजार व दहा हजार रुपये किंमतीच्या ब्रम्ही नोटा आतां कायदेशीर चलन नाहींत.

**टॅरिफ बोर्डाच्या प्रश्नपत्रिका**—हिंदी टॅरिफ बोर्डानें खालील उद्योगधंद्यांच्या संरक्षणाबाबत आपल्या प्रश्नपत्रिका तयार केल्या आहेत, त्या बोर्डाच्या कचेरींतून मिळूं शकतील. प्रश्नपत्रिका भरून पाठविण्याच्या असेरच्या तारखा उद्योगधंद्यांच्या नांवापुढें दिल्या आहेत.

| | |
|---|---|
| १ सोडियम सल्फाइट | २ सप्टेंबर |
| २ क्लोरोफॉर्म | ३१ जुलै |
| ३ सल्फ्युरिक पी. बी. व ॲनॅस्थेटिक | ३१ जुलै |
| ४ पोटॅशियम परमँगेनेट | ३१ जुलै |
| ५ सायकली | १५ ऑगस्ट |
| ६ शिवण्याचीं यंत्रें | २ सप्टेंबर |
| ७ प्लायवुड टी चेस्ट्स | ३० सप्टेंबर |
| ८ सोडियम मेटॅबायसल्फाइट | २ सप्टेंबर |


# गव्हर्नमेंट ऑफ इंडिया

## ३॥ टक्क्याच्या बिनफेडीच्या कर्जांत बदल

**मुदतः—१५ ऑगस्ट १९४६ पासून १६ सप्टेंबर १९४६ पर्यंत**
**(दोनही दिवस धरून)**

(१) ३॥ टक्क्याचे १८४२–४३ चे कर्जरोखे
(२) ३॥ टक्क्याचे १८५४–५५ चे कर्जरोखे
(३) ३॥ टक्क्याचे १८६५ चे कर्जरोखे
(४) ३॥ टक्क्याचे १८७९ चे कर्जरोखे
आणि (५) ३॥ टक्क्याचे १९००–०१ चे कर्जरोखे

(गव्हर्नमेंट नोटीस नं. डी. / ४७६६–बी/४६, २४ मे १९४६ प्रमाणें परतफेडीसाठीं जाहीर झालेले)

धारण करणाराना (१) १९४६ चे ३ टक्क्याचे (दर्शनी) १०० रु. किंमतीबद्दली १०० रु. किंमतीचे कर्जरोखे किंवा (२) (दर्शनी) १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबद्दली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे घेतां येतील.

३ टक्क्यांचे १९४६ चे बदली कर्जरोख्यांची १६ सप्टेंबर १९८६ पर्यंत परतफेड होऊं शकणार नाहीं. आणि हे कर्जरोखे धारण करणाराला ४० वर्षेपर्यंत ३ टक्के व्याज मिळण्याची हमी दिली जाईल.

रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील शाखेमध्यें आणि इतरत्र इंपीरियल बँकेच्या शाखेंत व सर्व ठिकाणीं सरकारी तिजोरीमध्यें अर्ज घेतले जातील.

सविस्तर माहितीसाठीं यापैकीं कोणत्याही कचेरीस, शाखेस किंवा तिजोरीस लिहा.

(हिंदुस्थान सरकारच्या फायनान्स खात्याचें प्रकाशन)

# अर्थ

बुधवार, ता. ३१ जुलै १९४६





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.


## शेतीच्या मालाच्या किंमतींत स्थिरता

### कृष्णमाचारी समितीच्या शिफारसी

सर व्ही. टी. कृष्णमाचारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुस्थान सरकारनें २९ फेब्रुवारी, १९४५ रोजीं शेतकी, जंगलें व मच्छीमारी ह्यांच्याविषयीं धोरणाचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या ' किंमत उपसमिती ' चा अहवाल तयार झाला आहे. ह्या अहवालाचा गोषवारा प्रसिद्ध झाला तो अत्यंत त्रोटक स्वरूपाचा आहे. परंतु समितीच्या उद्देशांची कल्पना येण्यास तो पुरेसा आहे.

( १ ) शेतकीच्या उत्पादनाची किंमत कोणत्या तत्त्वावर निश्चित ठरविण्यांत यावी, ( ह्यांत औद्योगिक कारणासाठी केलेल्या पिकांचाहि समावेश होतो ) आणि ( २ ) ठरविण्यांत आलेल्या किंमती प्रभावी कशा करण्यांत याव्या आणि त्या किंमतींत मालास खात्रीची बाजारपेठ कशी मिळवून द्यावी, हे प्रश्न प्रस्तुत उपसमितीकडे विचारासाठी सोपविण्यांत आलेले होते. शेतकऱ्यांस सहाय्य करण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या उत्पादनाच्या मालाची योग्य किंमत ठरवून देणें, हा होय असें उपसमितीचें मत झालें. उत्पादकास कांहींतरी किमान बाजारभाव मिळणें आवश्यक आहे हें जसें खरें आहे त्याचप्रमाणें उपभोक्त्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं, कांहीं ठराविक, मर्यादेबाहेर किंमती जाऊं न देणें हेंहि अगत्याचें आहे, असें उपसमितीनें विचारपूर्वक ठरविलें आहे. हें नियंत्रण व्यावहारिक कसें ठरणार हा प्रश्न येथें साहजिकच उपस्थित होतो. बाजारांतील माल जरूरीपेक्षां ज्यास्त होऊन त्याची किंमत खालीं जाऊं नये ह्यासाठीं सरकारनें जरूर तेवढा माल स्वतः खरेदी केला तर मागणी-पुरवठ्याचा मेळ बसूं शकेल. त्याचप्रमाणें, बाजारांतील मालाचा पुरवठा कमी पडला तर तो वाढवून सरकारास तो मेळ त्या दुसऱ्या मार्गानें घालावा लागेल. अशा तऱ्हेनें पुरवठा वाढविणें किंवा तो आखडून घेणें सरकारास कितपत शक्य आहे, हा येथें महत्त्वाचा प्रश्न आहे. बाजारांतील चालू कमाल किंमतीस उपलब्ध असेल तो माल सरकार घेऊं शकलें आणि जरूरीप्रमाणें आपल्या जवळील माल कमाल किंमतीपेक्षां कमी दरानें बाजारांत आणून सोडूं शकलें, तरच सरकारास स्वतःची जबाबदारी पार पाडतां येईल. सरकारनें शेतीच्या उत्पादनाची वाजवी किमान किंमत कोणत्या तत्त्वावर ठरवावयाची ह्याची स्पष्ट कल्पना आज करतां येणें शक्य नाहीं. उत्पादक आणि उपभोक्ते ह्या दोघांनाहि ती वाजवी वाटली पाहिजे आणि उत्पादकास त्या किंमतीमुळें विशेष नफा मिळाला नाहीं, तरी त्याचा चरितार्थ नीट चालला पाहिजे हें उघड आहे. शेतीचा उत्पादन खर्च ज्यामुळें ठरतो अशा जिनसांच्या किंमतींचें व शेतकऱ्याच्या रहाणीच्या खर्चाचें मान हें लक्षांत घेऊनच शेतीच्या उत्पादनाची व विक्रीची किंमत निश्चित करावी लागेल, असें उपसमिती म्हणते आणि त्यास आधार म्हणून १९२५ ते १९३२ मधील किंमती ह्या आधारभूत घेण्यांत याव्या, अशी उपसमितीची सूचना आहे. किंमती निश्चित करतांना लक्षांत घ्यावयाच्या अनेक बाबी आहेत. तथापि, शेतीच्या मालाच्या किंमतींचें नियंत्रण प्रतिपादन करणें व किंमती ठरविण्याचीं तत्त्वें मांडणें आणि प्रत्यक्ष व्यवहारांत हें नियंत्रण आणून तें यशस्वी करणें ह्यांत फार मोठें अंतर आहे, ही गोष्ट मात्र येथें नमूद करणें आवश्यक आहे. सबंद हिंदुस्थानासाठीं योजना अमलांत आणण्यास शेकडों कोटि रुपये खर्च येईल, ही गोष्टहि येथें विसरून भागणार नाहीं. जमीनमहसुलाच्या पद्धतींत उपसमितीनें दूरगामी सुधारणा सुचविल्या आहेत, त्यांची अंमलबजावणीहि सोपी नाहीं. आगामी घटनेंत हिंदुस्थानास मध्यवर्ती व एकसूत्री आर्थिक धोरण आखतां येईल किंवा नाहीं, ही हि एक मोठी अडचण आहे.

उपसमितीच्या वरील सूचनांचें उद्दिष्ट सरकारी सहायानें शेतीचा धंदा किफायतशीर करून त्यांत नफ्याचा अंश निर्माण करणें हा आहे. शेती किफायतशीर झाली, म्हणजे शेतीमध्यें भांडवल गुंतविणाराला प्रोत्साहन मिळेल आणि त्याचा परिणाम लोकांची क्रयशक्ति वाढण्यांत होईल, अशी अपेक्षा आहे. लोकांची क्रयशक्ति वाढण्याचें अगत्य हिंदी औद्योगीकरणाच्या दृष्टीनें विशेष आहे, कारण आतां हिंदुस्थानांतील उद्योगधंदे झपाट्यानें वाढण्याच्या मार्गावर आहेत आणि त्यांचें यश त्यांच्या मालास हिंदुस्थानांतच मोठी मागणी निर्माण होण्यावर अवलंबून आहे. शेती सुधारणेमुळें पिकांची वाढ होऊन अन्नपुरवठा सुधारेल आणि क्रयशक्ति वाढून उद्योगधंदे भरभराटीस लागतील; आणि त्या सर्वांमुळें सबंद देशाची आर्थिक स्थिति सुधारेल ह्या मोठ्या अपेक्षेच्या दृष्टीनें व सदिच्छेनें उपसमितीनें सूचना केल्या आहेत. लोकांच्या विश्वासाचें, एकसूत्री, दूरदर्शी व चिकाटीनें प्रयत्न करणारें सरकार असल्याशिवाय उपसमितीच्या सूचनांचा नीट विचारहि होणें अशक्य दिसतें.

**सोन्याचें जागतिक उत्पादन**–१९४०, १९४४, १९४५ मधील सोन्याच्या जागतिक उत्पादनाचे आकडे खालीं दिले आहेत. त्यांत रशियांतील उत्पादनाचे आकडे अर्थातच नाहींत. कारण, ते मिळूं शकत नाहींत. १९४० चे मानानें १९४५ मधील सोन्याचें उत्पादन ३५% कमी भरलें. १९४५ मधील उत्पादनांत द. आफ्रिकेचें उत्पादन ४५% होतें. कॅनडाचा अनुक्रम नंतर येतो.

उत्पादन ( हजार औंस )

| | १९४० | १९४५ |
|---|---|---|
| द. आफ्रिका | १४,०४७ | १२,२१४ |
| कॅनडा | ५,३११ | २,६६२ |
| अमेरिका | ४,८६३ | ९८८ |
| मेक्सिको | ८८३ | ६०० |
| ऑस्ट्रेलिया | १,६४४ | ६०० |
| इतर | १४,०६३ | ९,४३६ |
| | ४०,८११ | २६,५०० |

**हिंदुस्थान-अमेरिका व्यापार**—हिंदुस्थानानें १९४५ सालीं अमेरिकेकडे निर्गत केलेल्या व अमेरिकेकडून आयात केलेल्या प्रमुख मालाचा तपशील खाली दिला आहे:–

| अमेरिकेकडे | निर्गत ( लक्ष डॉलर ) | अमेरिकेकडून | आयात ( लक्ष डॉलर ) |
|---|---|---|---|
| ताग | ५६२ | तंबाखूचे जिन्नस | ९६ |
| चहा | १५९ | यंत्रसामुग्री | ७४ |
| काजू | १५७ | डांबरापासून केलेले जिन्नस | ६९ |
| लोकर | ६९ | औषधें | ५६ |
| कातडी | ६५ | कागद | ४६ |
| कपास | ६५ | लोखंड पोलादाचे जिन्नस | ३१ |
| शेलॅक | ४८ | दारू | २८ |
| लाख | २४ | विद्युत यंत्रसामुग्री | २५ |
| औषधें, पाला | १३ | मोटारी वगैरे | १४ |
| मायका | १२ | फोटोचें सामान | १३ |

# स्फुट विचार

## मध्यपूर्वेंतील तेलाचें राजकारण

आंतरराष्ट्रीय राजकारणाची प्रचलित भाषा बोलतांना राष्ट्रीय हितसंबंध 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' असे शब्दप्रयोग करण्याची मुत्सद्यांची वहिवाट असते. अशा शब्दप्रयोगांच्या बुरख्याखालीं दडलेली वस्तुस्थिति सामान्य लोकांना माहीत नसते; इतकेंच नव्हे तर ती वस्तुस्थिति बुद्ध्या अंधारांत ठेवण्याचेही प्रयत्न पुष्कळदां करण्यांत येतात. मध्यपूर्वेंतील तेल मिळण्यासाठीं इंग्लंड, अमेरिका व आतां नव्यानें सोव्हिएट रशिया यांच्यांतील चुरशीची सत्यकथा तेलाच्या कंपन्यांच्या मालकांना अधिक चांगली माहीत असते त्यामुळें ते अशा शब्दप्रयोगांच्या खोट्या नाण्याला न भुलतां आपले व्यवहार संथपणें चालवीत असतात. मध्य-पूर्वेंतील तेलाचें राजकारण म्हणजे या कंपन्यांचें अर्थकारण होय. तेलाच्या खाणी हस्तगत करण्यासाठी वरील तीन राष्ट्रांची धडपड नेहमीच चालू रहाणार आहे. पण हा प्रश्न केवळ खाणी हस्तगत करण्याचा नाहीं. खाणी हस्तगत केल्यावर उपसलेलें तेल जगाच्या बाजारपेठेंत किती स्वस्त विकतां येईल हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि या प्रश्नामुळेंच मध्यपूर्वेंतील तेलाला महत्त्व प्राप्त झालेलें आहे. मध्यपूर्वेंतील तेल अत्यंत स्वस्त असून चुनखडीच्या दगडाच्या थरांतून थोड्या प्रयासानें काढतां येतें. अमेरिका सोडली तर प्रथम वर्षींच १० लाख पिंपें तेल देणारी मोठी खाण इराणमधील ॲंग्लो-इराणिअन कंपनीचीच होती. हें तेल उपसण्याला खर्च कमी असल्यानें बाजारपेठेंत तें स्वस्त विकतां येतें. उलट व्हेनेझुएला या दक्षिण अमेरिकेंतील देशांतील तेल महाग पडतें. पण या देशांतील तेल कंपनी व ॲंग्लो-इराणिअन तेल कंपनी एकाच्याच मालकीच्या असल्यानें स्पर्धेचा प्रश्न आजपर्यंत उद्भवत नसे. आतां मात्र ही परिस्थिति बदलण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. रशिआला उत्तर इराणमधील तेलाच्या खाणींत भागीदारी मिळाल्यामुळें पुढें मागें तेलाच्या बाजारपेठेंत रशिअन तेल येऊन भाव गडगडण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. केवळ आर्थिक दृष्टीनें पाहिलें तर तेलाला मिळेल तितकी अधिक किंमत घेणें रशियाच्या हिताचें आहे. परंतु ब्रिटन-अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्याच्या डोळ्याला इंगळ्याच लावावयाच्या म्हटल्या तर रशियाला तेंही शक्य आहे, अर्थात् तेलाच्या बाजारपेठेंत प्रतिस्पर्धी म्हणून उतरण्यास रशियाला अजून एक-दोन वर्षें तरी लागतील. तेलाच्या खाणी व तेथून काढण्यांत आलेले तेलाचे नळ यांच्या सुरक्षिततेसाठीं आझर बैजन प्रांतांत आपल्याशीं मित्रभावानें वागणारें सरकार राहील अशी दक्षता रशिया घेईल हेंही उघडच आहे.

## ब्रिटनमधील पावाचा शिधा

हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षांची सहानुभूतीनें तरफदारी करणारे लेखक मि. एच. ब्रेल्सफर्ड यांनीं रेनॉल्ड न्यूज या वृत्तपत्रांत ब्रिटनमधील पावाच्या शिध्याबद्दल पुढील आशयाचे विचार व्यक्त केले आहेत. ब्रिटिश-गृहिणींनी या योजनेशीं सहकार्य केलें तर हिंदुस्थानांतील लाखों कामगारांचे व लहान मुलांचे प्राण वांचविल्याचें श्रेय त्यांना मिळणार आहे. सर्वसामान्य हिंदी कुटुंबांतील माणसाला दरदिवशीं फक्त १२ औंस अन्नधान्यावरच आपली गुजराण करावी लागते; मग दूध, मांस, अंडीं इत्यादि पोषक अन्नाबद्दल तर बोलावयासच नको. इतक्या शिध्यावर कुटुंबाचें उदरभरण करण्याची पाळी ब्रिटिश गृहिणींवर आली तर त्या एका आठवड्याच्या आंतच निराश होतील. पण हिंदी गृहिणी हें दिव्य आज कित्येक महिने करीत आहेत. मी म्हैसूर संस्थानांत हिंडून तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहून आलों आहे. मला असें आढळून आलें कीं, त्या संस्थानांतील कांहीं खेड्यांतून तर डोई दरमाणशीं शिध्याचें प्रमाण ७ औंस इतकें खालीं उतरलेलें होतें. कांहीं खेड्यांतून तर ५ औंस शिधा सुद्धां मिळणें दुरापास्त झालें होतें. शेतीवर रोजमजुरी करणाऱ्या बिगाऱ्याची स्थिति तर याहीपेक्षां वाईट आहे. ज्याची बिगार करावयाची त्या मालकानें मजुराला खाऊं घालावें असा नियम. पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्या मजुरांना जेवण तर मिळत नव्हतेंच; उलट नियमाची अंमलबजावणी केली जाते असें गृहीत धरून मजुरांना शिध्याचीं कार्डें मात्र देण्यांत येत नाहींत. ब्रिटनमध्यें आपणास दुष्काळ म्हणजे काय असतो याची कल्पना नाहीं. मी म्हैसूर संस्थानांत असतांना रस्त्याकडच्या झाडांचीं पानें व कंदमुळें खाण्यासाठी उकरून काढणाऱ्या स्त्रिया पाहिल्या आहेत. या दीनवाण्या देखाव्याचा चित्रपट घेऊन तो ब्रिटनमध्यें प्रत्येक सिनेमागृहांत दाखविता आला असता तर फार चांगलें झालें असतें. पाव शिधा-पद्धतींत समाविष्ट केल्याबरोबर ब्रिटिश गृहिणींच्या कपाळावर चिंतेच्या रेषा उमटल्या पण हिंदी मातांच्या डोळ्यांपुढें मृत्यूचें तांडवनृत्य एक सारखें थैमान घालीत असतें. त्यामुळें त्यांचा चेहरा किती भयानक दिसतो याची कल्पनाच केलेली बरी. आपण जो ५ लाख टन गहूं पाव शिध्यांत दाखल करून वांचवूं त्यामुळें व दुसरीकडून येणाऱ्या धान्याची वचनपूर्ति झाला तर हिंदुस्थान दुष्काळ व जगण्यापुरतें अन्न यांच्या सीमेवर कसा तरी उभा राहील.

## अमेरिकेंत विमापत्रकावरील कर्जांची वाढ

अमेरिकन अर्थव्यवस्था युद्धकालीन निर्बंधापासून मुक्त झाल्यावर ती सुसूत्र चालण्याच्या मार्गांत काय अडचणी येण्याचा संभव आहे याचें स्थूल दिग्दर्शन 'अर्था'च्या ता. १७ जुलैच्या अंकांत केलेलें आहे. अनिर्बंध अर्थव्यवस्थेंत तेजी-मंदीच्या लाटा एकामागून एकसारख्या येणें अपरिहार्यच असतें. अमेरिकेच्या भाव-वस्तुनियंत्रण खात्याचे प्रमुख अर्थशास्त्रज्ञ मि. रिचर्ड गिलबर्ट यांनीं अमेरिकेंतील चढत्या बाजारभावांना एकदम उतरण लागणार असें भाकित केलें आहे. मि. गिलबर्ट म्हणतात "सध्यां अमेरिकेंतील बाजारभाव भरमसाट वाढलेले आहेत, फायद्याची मर्यादा फुगलेली आहे आणि सामान्य माणसाच्या उत्पन्नांत मात्र अनिश्चितता उत्पन्न झाली आहे. याचा परिणाम एकच; आणि तो म्हणजे मंदीची अवकळा," मि. गिलबर्ट यांच्या भाकिताला पुष्टि देणारीं कांहीं चिन्हें अमेरिकेंत आज दिसूं लागलेलीं आहेत. जपानविरोधी युद्धाची समाप्ति झाल्यापासून विमा-पत्रकावर देण्यांत येणाऱ्या कर्जांत बरीच वाढ झाल्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे. अर्थात यांपैकीं कांहीं वाढ युद्धकालीन अर्थव्यवस्थेंतून शांतताकालीन अर्थव्यवस्थेंत रूपांतर होण्याच्या प्रक्रियेंतून उत्पन्न झालेली आहे. तरी पण वाढत्या किंमती आणि अनिश्चित अगर घटत चाललेलें उत्पन्न यांच्या कात्रींत सांपडलेल्या कुटुंबप्रमुखांनीं खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितांच पॉलिसीवरील कर्जें काढलीं असावीं असा अंदाज करण्यांत येत आहे. गेल्या वर्षींच्या मध्याच्या सुमारास पॉलिसीवर देण्यांत आलेल्या कर्जांचा आकडा अगदीं कमी झाला होता. जपानी युद्धाची इतिश्री होईपर्यंत या कर्जांच्या आकड्यांत फारसा फरक पडला नाहीं. त्यानंतर मात्र हा आकडा दर आठवड्यास फुगत चालला. कांहीं कंपन्यांत तर पॉलिसीवरील कर्जांची दुपटीहून अधिक वाढ झाली. १९४४ च्या दुसऱ्या सहामाहींत पॉलिसीवर जितकीं कर्जें घेण्यांत आलीं त्यापेक्षां ५० टक्के अधिक कर्जें १९४५ च्या दुसऱ्या सहामाहींत घेण्यांत आलीं. विमेदारांकडून कंपनीला यावयाच्या परतफेडीच्या कर्जांत मात्र घट झालेली आढळून आली आहे. १९४४ सालअखेर या कर्जांची रक्कम २ अब्ज १३ कोटी ४० लाख डॉलर्स होती, ती १९४५ अखेर १ अब्ज ९५ कोटी डॉलर्स झाली. कंपन्यांनीं दिलेलीं कर्जें व विमेदारांनीं फेडलेलीं कर्जें यांच्या दिशांत जो विरोध दिसून येतो त्यावर मात्र अमेरिकन आयुर्विमासंस्थेनें कांहीं प्रकाश पाडलेला नाहीं. तथापि विमेदारांच्या उत्पन्नांची व व्यवसायांची गटवार वर्गवारी केली तर या परस्परविरोधी दिशांचा उलगडा करणें सुलभ होईल पण सुधारलेल्या राष्ट्रांतूनसुद्धां सध्या ज्या पद्धतीनें आंकडेशास्त्र शिकविलें जातें, त्याच्या चौकटींत अशी वर्गवारी करण्यांत येत नाहीं.

**हिरे खरेदण्यासाठी धडपड**—कोणत्याहि चलनापेक्षां हिरे हे पैसे ठेवण्याचें सुरक्षित साधन आहे, ह्या कल्पनेनें दक्षिण आफ्रिकेंतील युरोपियन व अमेरिकन लोक हिऱ्यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. ह्या खरेदीदारांत काळ्याबाजारामध्यें पैसे कमावलेले लोक, स्वदेशीं परतणारे निर्वासित, वगैरेच प्रामुख्यानें आहेत. अमेरिकेंतील किंमतींचें नियंत्रण रद्द होऊन भरमसाट चलनवृद्धि होईल ह्या भीतीनें हिऱ्यांच्या खरेदीस चालना दिली आहे.

# 'विक्रीकर : ठोकळ मुद्दे.'

( श्री. श्री. वा. दातार, बी. एससी., एलएल. बी. )

### करपात्रता

विक्री कराच्या कायद्याची अंमलबजावणी १ आक्टोबर १९४६ पासून सुरू होणार आहे.

३१ मार्च १९४५ रोजीं पुऱ्या झालेल्या वर्षांत ज्या व्यापाऱ्यांची एकूण विक्री दहा हजार रुपयांहून अधिक होती ते करास पात्र आहेत.

प्रथमतः करास पात्र नसलेल्या व्यापाऱ्यांची विक्री पुढील ज्या वर्षीं दहा हजारांवर जाईल, तें वर्ष संपल्यानंतरची पहिली तिमाही संपेल त्या तारखेपासून असे व्यापारी करास पात्र होतील.

एकदां आलेली करपात्रता पुढें तीन वर्षेपर्यंत कायम राहील. त्यानंतर सरकार देईल ती मुदत संपल्यावर करपात्रता नाहींशी होईल. दरम्यानच्या एकाद्या वर्षीं एकूण विक्री दहाहजारांवर गेली कीं पुनः करपात्रता येईल.

### रजिस्ट्रेशन

करास पात्र असलेल्या सर्व व्यापाऱ्यांनीं आपलें नांव नोंदवावें लागेल.

व्यापाराच्या वस्तु करपात्र असोत वा करमुक्त असोत, कोणतीही वजावट न करतां ज्यांची वार्षिक सरसकट विक्री दहा हजारांहून अधिक असेल त्यांनीं रेजिस्ट्रेशन करणें आवश्यक आहे.

### करपात्र विक्री

एकूण विक्रींतून

( अ ) ( १ ) करमाफ वस्तूंची विक्री

( २ ) दुसऱ्या रजिस्टर्ड व्यापाऱ्यास पुनर्विक्रीसाठीं केलेली विक्री

रजिस्टर्ड कारखानदारास मालनिर्मितीसाठीं केलेली विक्री

रजिस्टर्ड कंत्राटदारास कंत्राटीकामासाठीं लागणाऱ्या साहित्याची विक्री

( ३ ) इलाख्याबाहेर पाठविलेल्या मालाची विक्री

( ४ ) व इतर अन्य सरकार ठरवील ती विक्री वजा घालावयाची

( ब ) नंतर उरलेल्या आंकड्यांतून त्याच्या ३ टक्के रक्कम वजा घालावयाची

उरलेली विक्री ही करपात्र विक्री होय.

### आकार

करपात्र विक्रीच्या प्रत्येक पूर्ण रुपयास दोन पैसे प्रमाणें कर भरावयाचा.

### करमाफ वस्तू

( १ ) कडधान्यें, डाळी व तांदूळ; ( २ ) पिठें आटा, मैदा वगैरे, ( ३ ) पाव; ( ४ ) मांस; ( ५ ) मच्छी; ( ६ ) ताजीं अंडीं ( ७ ) शेळ्यामेंढ्या व बदकें-कोंबडी; ( ८ ) भाज्या, ( ९ ) ताजीं व सुकीं फळें, ( १० ) शिजवलेले खाद्य पदार्थ; पाशीं ८ आणेपर्यंत दरांचीं खाणावळींतील जेवणें. ( ११ ) गूळ, साखर, काकवी; ( १२ ) मीठ ( १३ ) मिरे, चिंच, मिरची; ( १४ ) गोठवलेलें व साधें दूध; ( १५ ) हलकें कापड, ( १६ ) केरोसीन ( १७ ) वैरण व सरकी ( १८ ) खतें ( १९ ) क्विनिन ( २० ) घरगुती व ऑफिस उपयोगासाठीं ज्वलन वायू ( २१ ) सर्व स्वरूपांतील तंबाकू ( २२ ) आगपेट्या ( २३ ) सोनें-चांदी ( २४ ) अबकारी पदार्थ ( २५ ) वीजशक्ति ( २६ ) मोटारींचें ज्वलनतेल ( २७ ) हातमागावरील कापड ( २८ ) घोंगड्या ( २९ ) ताक, दहीं, खाण्याचीं तेलें ( ३० ) जळाऊ लांकडें व कोळसा ( ३१ ) पेंड ( ३२ ) शालोपयोगी पुस्तकें व वस्तु.

### करपात्र वस्तू

करमाफ वस्तूंव्यतिरिक्त इतर सर्व जंगम माल करपात्र आहे. कर्जवसुलीचे हक्क, शेअर्स, स्टॉक्स, सिक्युरिटीज करपात्र नाहींत. इमारतींच्या दुरुस्तीसाठीं, सज्ज करण्यासाठीं, सुधारण्यासाठीं वा बांधणीसाठी लागणारें सामान करपात्र आहे.

### रिटर्न्स

रजिस्टर्ड व्यापाऱ्यांनीं आपल्या दर तिमाहींत झालेल्या विक्रीची माहिती देणारे तक्ते तिमाही संपल्यानंतर एक महिन्याचे आंत पाठवावयाचे आहेत.

रजिस्टर्ड नसलेल्या एकाद्या व्यापाऱ्याची वार्षिक विक्री दहाहजारांवर गेली असणें संभवनीय वाटल्यास त्या व्यापाऱ्यावर नोटीस बजावून नोटिशीपूर्वीच्या जास्तींत जास्त १८ महिन्यांच्या मुदतींतील विक्रीची माहिती देणारे तक्ते विक्रीकर अधिकारी भरून मागवूं शकतील.

### कराचा भरणा

गांवोगांवीं गव्हर्नमेंट ट्रेझरींत व मुंबई विभागांत रिझर्व बँकेंत आगाऊ करावयाचा व तिमाही तक्त्याबरोबर आगाऊ कर भरल्याबद्दलचें चलन पाठवावयाचें.

### कराची आकारणी

व्यापाऱ्याचे तक्ते समाधानकारक वाटल्यास त्यावरून अगर जरूर तेथें पुरावा घेऊन, हिशेब तपासून, कराची आकारणी केली जाईल. जादा भरणा परत मिळूं शकेल.

### हिशेब व तपासणी

हिशेब हव्या त्या मार्गानें सुबोध रितीनें ठेवावेत.

सामान्यतः अकल्पितपणें येऊन हिशेब तपासण्याची आवश्यकता नसेल तेव्हां व्यापाऱ्यांच्या सोई पाहून वा नोटिसा देऊन मागणी करून हिशेब तपासले जातील.

संशयित हिशेबाच्या वह्या जप्त करण्याचा अधिकार आहे.

### रजिस्ट्रेशनमधील फरक

दुकानची मालकी बदलली; व्यापाराच्या वस्तु बदलल्या; जागा बदलली; दुकान बंद केलें अथवा विकलें; नवीन जादा दुकान उघडलें; किंवा असाच इतर अन्य कांहीं फरक घडवून आणला अथवा घडला तर त्वरित अधिकाऱ्यांकडे माहिती पुरविली पाहिजे.

मालक मरण पावल्यास त्याच्या वारसाकडे माहिती व कर देण्याची जबाबदारी जाईल. मालक बदलल्यास नव्या मालकाकडे जाईल.

### वादांचा निकाल

करपात्रता ठरविण्याबाबत निघणाऱ्या सर्व वादांचा निकाल कर अधिकाऱ्यांना देतां येईल.

कराचे आकारणीबाबत कराधिकाऱ्यांचे निकालाविरुद्ध दिवाणी कोर्टांत अपिलें चालणार नाहींत; पण वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपिलें करण्याची सोय आहे.

### गुन्हे

पुढील गोष्टी गुन्ह्यांत जमा होतात.

( १ ) रजिस्ट्रेशनची आवश्यकता असतांना तें न करतां व्यापार चालू ठेवणें.

( २ ) निष्कारण तक्ते भरून न पाठवणें.

( ३ ) विशिष्ट मालाचे विक्रीसाठीं रजिस्ट्रेशन नसतांना तें आहे असें भासविणें.

( ४ ) रजिस्टर्ड व्यापारी नसतांना रजिस्टर्ड आहे असें भासविणें.

( ५ ) अधिकाऱ्यांनीं सुचविलेल्या पद्धतीप्रमाणें हिशेब न ठेवणें.

( ६ ) तपासणीसाठीं हिशेब, कागदपत्र व माहिती न पुरविणें.

( ७ ) खोटे हिशेब ठेवणें व दाखविणें, आणि खोटी माहिती देणें.

( ८ ) हिशेब तपासणीस वह्यांच्या जप्तीस अडथळा करणें.

( ९ ) रजिस्ट्रेशनमधील फरकांची माहिती देण्यांत हयगय करणें.

सर्व गुन्हे तडजोडीनें मिटविण्यास वाव आहे.

---

**कापडाच्या किंमतीमधील वाढः**—जाड्याभरड्या कापडाच्या किंमतींत १ ऑगस्ट पासून करण्यांत आलेली वाढ थोडीफार तरी टाळत येणार नाहीं काय, यासंबंधीं गिरणीवाल्यांशीं विचारविनिमय करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारचे अधिकारी मुंबईस लवकरच भेट देणार आहेत. तोपर्यंत वाढलेल्या किंमतीच अंमलांत रहातील.

## निकेलच्या नाण्यांची पार्श्वभूमि

हिंदुस्थान सरकारानें रुपयाखालील नाणीं निकेलचीं काढण्याचें ठरविलें त्याप्रमाणें तीं नाणीं आतां व्यवहारांत खेळूं लागलीं आहेत. चांदीचें चलनांतील महत्व हळुहळू कमी होत चाललें होतें, त्या प्रवृत्तीस हीं नवीं नाणीं पोषकच आहेत. अमेरिकन सरकारकडून हिंदुस्थान सरकारनें युद्धकाळांत बरीचशी चांदी उसनी घेतली आहे ती ऐनजिनसी परत करण्याची आहे. इकडे, चांदीची किंमत तर वाढत चालली आहे. सध्याच्या रुपयांत अर्धा तोळा चांदी असते. म्हणजे, १०० तोळ्यांस २०० रुपयांपेक्षा ज्यास्त भाव चढला कीं रुपये वितळविणें किफायतशीर ठरेल हें उघड आहे. मुंबईच्या बाजारांतील चांदीची किंमत १७५ रुपयांच्या आसपास जाऊं लागली म्हणजे रुपये वितळले जाण्याचा प्रसंग फारसा दूर रहाणार नाहीं. वरील दोन्ही कारणांसाठी, चांदीची बचत करणें हिंदुस्थान सरकारला, भाग पडलें आहे.

---

## स्थानिक स्वराज्यसंस्थांची ओढाताणीची आर्थिक परिस्थिति

मुंबई प्रांताच्या लोकल ऑडिट खात्याचा १९४४–४५ चा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, त्यांत स्थानिकस्वराज्य संस्थांच्या असमाधानकारक आर्थिक परिस्थितीचा दरसालप्रमाणें पुनः उल्लेख करण्यांत आला आहे. कांहीं संस्थांनीं उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला परंतु तें उत्पन्न महागाई-भत्ता आणि वाढलेला खर्च भागविण्यांतच खर्ची पडलें. विशिष्ट कारणासाठीं राखून ठेवलेला पैसा चालू खर्चासाठीं वापरणें, मागील साठलेल्या शिलकांचा शक्य तेवढा उपयोग करणें किंवा आवश्यक देणें पुढें ढकलणें, इत्यादि मार्गांनीं कित्येक स्थानिक स्वराज्य संस्था आपला संसार चालवीत आहेत. अथणी, बागलकोट, गोध्रा, गोकाक, करमाळा, नंदुरबार, निपाणी, शिरपूर, शिरशी, इत्यादि म्युनिसिपॅलिट्यांच्या एकूण येण्याच्या २५% पेक्षां अधिक रक्कम थकलेली आहे, असें ऑडिट खात्याच्या रिपोर्टांवरून दिसून येतें.

---

## कमी कामाचे तास व वेतन

येत्या ऑगस्टपासून गिरण्यांतील कामाचे साप्ताहिक तास ५४ वरून ४८ वर यावयाचे आहेत. म्हणजे, रोजचे कामाचे तास ९ ऐवजी ८ होणार आहेत. रोजंदारीनें काम करणारांचें काम त्यामुळें कमी झालें तरी त्यांची मजुरी कायम राहील, आणि ज्यांचें वेतन कामावर अवलंबून आहे अशांच्या वेतनांत कामाचे तास कमी झाले तरी छाट होऊं नये म्हणून त्यांत १२½% वाढ करण्यांत आली आहे. परंतु ही वाढ भत्त्यांची रकम एकूण वेतनांतून वजा करून उरलेल्या मूळ वेतनांत केलेली आहे, ही खोच हितसंबंधी लोकांस सहज लक्ष्यांत येण्याजोगी आहे.


---

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

मेसर्स नाईक आणि कं. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीस १९४५ सालीं १,३१,२३७ रुपये निवळ नफा झाला. २,२०,००० इनकमटॅक्ससाठी व ७०,२४८ रुपये घसाऱ्यासाठी बाजूस काढून इतका नफा निघाला आहे. मॅनेजिंग एजंटांस ५०,१७६ रुपये कमिशन मिळालें व औद्योगिक सल्लागार श्री. रामराव (कंपनीचे चेअरमन) ह्यांस ८,४०० रुपये मोबदला देण्यांत आला. भागीदारांस सबंध वर्षाकरितां १२½%करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. त्याला १ लक्ष रुपये लागतील.

म्हैसूर सिल्क फिलेचर्सच्या वेगवेगळ्या केंद्रांत आतां ८०४ बेसिन्स चालू आहेत. युद्धसमाप्तीनंतर, सरकारला रेशीम पुरविण्याची कंपनीची जबाबदारी संपली व तिचें "चामुंडी" रेशीम नागरी मागणी पुरी पाडण्यास उपलब्ध झालें आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. ४ ऑगष्ट रोजीं म्हैसूर येथें भरणार आहे.

---

# सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ २८–५–१९४६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,४१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,८१,००० |
| ठेवी | ... | रु. ६१,४१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ६७,५०,००० |

नवीन योजना—"विम्याचे हप्ते, कॉलेज फी, हॉस्पिटल खर्च, कपडा, प्रवास खर्च वगैरे गरजांची खर्चविभागणी सुलभ रीतीनें करतां यावी, यासाठी ही योजना आहे. या योजनेनुसार दर महिना ५ ते २५ रु. पर्यंत बचत करून २ टक्के व्याज मिळवितां येतें."

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

# दररोज लागणारें ताजें
# दहीं
## —शेरास ८ आणे—

म. गो. कुलकर्णी

किराणा–भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें १.




आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

☞ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ☜

९६ नारायण पेठ, पुणें २.

## विमापत्रकांतील अटींचें महत्त्व

### शुश्रूषागृह हें इस्पितळ नव्हे

हिंदी आयुर्विमा कंपन्यांची गेल्या कांहीं वर्षांत झपाट्यानें प्रगति झालेली असली तरी या: कंपन्यांपासून आयुर्विमा पत्रकें घेणारे विमेदार मात्र हक्कपूर्तीची वेळ येईपर्यंत बहुधा कुंभकर्णी निद्रेंत घोरत पडलेले असतात. त्यांची झोप उडून जाण्यासारखा एखादा धक्का देणारा प्रसंग झाला म्हणजे ते जागे होतात; पण पुष्कळदां असें होतें कीं त्या सुमारास विमा–कंपनीची काकदृष्टि डोळ्यांत तेल घालून पॉलिसीमधील अटींचें ध्यान करीत असते. अशा परिस्थितींत विमेदारास पस्तावण्याचा प्रसंग आल्यास नवल नाहीं. म्हणून विमेदारांनीं विम्याच्या अटी काळजीपूर्वक वाचणें जरूर आहे. आपल्याकडे अजून आजारीपणाचा विमा उतरण्यांत येत नाहीं. परंतु इंग्लंड–अमेरिकेसारख्या देशांतून अशा प्रकारचे विमे उतरतात. उदाहरणार्थ, अमेरिकेंत आजारी पडल्यास इस्पितळाचा खर्च देण्याची जोखीम स्वीकारण्यांत येते. अशा प्रकारच्या पॉलिसींमधील अटीही किती महत्त्वाच्या असतात हें अमेरिकेंतील एका कोर्टानें दिलेल्या निर्णयावरून दिसून येतें. एका बाईला मनगटाच्या संधिवाताची व्यथा होती. त्यासाठीं तिनें इस्पितळाच्या खर्चाची जोखीम घेणारी पॉलिसी घेतलेली होती. कर्मधर्मसंयोगानें मनगटाचें दुखणें बळावून त्या बाईला इस्पितळाचा आश्रय घेण्याची पाळी आली. परंतु इस्पितळांत जागा न मिळाल्यामुळें सदर बाईनें एका शुश्रूषागृहांत आपली सोय लावून घेतली. शुश्रूषागृहांत या बाईचा खाजगी डॉक्टर येऊन औषधोपचार करीत असे. दुखण्यांतून बरी झाल्यावर बाईनें कंपनकिडून दुखण्याबाबत झालेल्या खर्चाची मागणी केली. त्यावर विमा–कंपनीनें पैसे देण्याचें नाकारलें, व कारण असें सांगितलें कीं, पॉलिसींतील अटीप्रमाणें 'इस्पितळ' या शब्दप्रयोगांत शुश्रूषागृहाचा समावेश होऊं शकत नाहीं. इस्पितळांत ज्याप्रमाणें क्ष किरण–यंत्र, प्रयोगशाळा व दवाखाना असतो त्याप्रमाणें शुश्रूषागृहांत ही व्यवस्था नव्हती. अर्थातच शुश्रूषागृहांतील खर्च देण्याला कंपनी बांधलेली नाहीं. मूळ कोर्टानें बाईच्या बाजूनें खटल्याचा निकाल दिला. परंतु त्यावर कंपनीतर्फे अपील करण्यांत आलें. आणि अपील कोर्टानें बाईची बाजू न्याय्य असली तरी विमाकरारांतील अटींचा अर्थ काटेकोर लावण्यांत आला पाहिजे या मुद्यावर कंपनीच्या बाजूचा निकाल दिला. दाव्यांतील शब्दश्लेष आनंददायक होत असला तरी व्यावहारिक जगाच्या कायद्यांत त्याचें रूपांतर शब्दच्छलांत होतें; आणि झोपी गेलेल्याचे डोळे चांगलेच उघडतात ते असे.

---

### पूना मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेच्या ताळेबंदांत देणें बाजूस ८७,२२० रु. भांडवल; ५८,७७४ रु. रिझर्व्ह व इतर फंड्स; ८,०५,२११ रु. ठेवी वगैरे प्रमुख बाबी आहेत. ठेवींची रक्कम गतवर्षीच्या मानानें १,४०,२०४ रु. नीं वाढली आहे. बँकेनें सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या रोख्यांची पुस्तकांतील किंमत ५,४६,६४१ रु. असली तरी बाजारभावानें ती ५,७४,८७० रु. भरते. भागीदारांनीं गतवर्षी मंजूर केलेल्या पोट नियमाप्रमाणें स्थावरांचे तारणावर लांब मुदतीनें ८१,५८४ रु. गुंतविलेले आहेत. कोर्ट खर्च अंदाजपत्रकापेक्षा २,८९६ रुपयांनीं ज्यास्त झाला आहे, त्यास डायरेक्टर बोर्डानें मंजुरी मागितली आहे. "किफायतशीर गुंतवणूक नसल्यानें खर्चाची तोंडमिळवणी करणें कठीण जात आहे. तथापि वरील मर्यादा संभाळूनहि, बँकेनें ह्या वर्षी मिळविलेला नफा लवादी रक्कम लक्षांत घेतां बरा झाला" हें बोर्डाचें म्हणणें वस्तुस्थितीस धरूनच आहे. भागीदारांस ३% डिव्हिडंड मिळणार आहे.

---

### ३½% रोखे व धर्मादाय ट्रस्ट्स

साडेतीन टक्क्यांच्या रोख्यांचें तीन टक्क्यांत रूपांतर करण्यांत येत आहे, त्यामुळें सार्वजनिक कार्यांसाठीं निर्माण केलेल्या ट्रस्ट्सचें नुकसान होणार आहे. साडेतीन टक्क्यांऐवजीं तीन टक्के मिळणार, ह्याचा अर्थ त्यांचें उत्पन्न सुमारें १५% नें घटणार, हें उघड आहे. सतत साडेतीन टक्के व्याज मिळत रहाणार ह्या निश्चितीवरच ट्रस्ट्सचा खर्च आधारलेला असल्याकारणानें त्या खर्चांस आतां कात्री लावणें भाग पडणार आहे. आपल्या शिक्षणसंस्था, इस्पितळें, इत्यादींस अगोदरच पैशाची उणीव भासते; त्यात उत्पन्नांतील वरील घटीमुळें अधिकच अडचण निर्माण होणार आहे. व्याजाचे दर उतरल्या कारणानें ट्रस्ट्सच्या उपयुक्त कार्यांत खंड पडूं नये, ह्यासाठीं त्यांस ३½% व्याज मिळत रहावें, अशी एक सूचना करण्यांत आली आहे.

---

### पुस्तकांच्या खपाची छाननी

अमेरिकेंत पुस्तकांचे प्रकाशक, मुद्रक, विक्रेते इत्यादींची बुक इंडस्ट्री कमिटी नांवाची एक प्रातिनिधिक संस्था आहे. तिनें आपल्या धंद्याविषयीं माहिती गोळा करण्यासाठीं कांहीं तज्ज्ञ लोक नेमले, त्यांनीं १०६ शहरांतील ४,००० लोकांच्या मुलाखती घेऊन आपला संकलित अनुभव प्रसिद्ध केला आहे. बायबल हा ग्रंथ अद्याप सर्वांत अधिक लोकप्रिय असलेला आढळला. मुलाखत दिलेल्या लोकांपैकीं ३४% पेक्षां अधिक लोकांजवळ १०० पेक्षां अधिक पुस्तकें होतीं. वाचलेल्या ताज्या पुस्तकांपैकीं ५८% कादंबऱ्या होत्या. १डॉलर पेक्षां ज्यास्त किमतीच्या पुस्तकांसच विशेष मागणी होती. विकत घेणारांपेक्षां उसनवार आणलेलीं पुस्तकें वाचणारेच अधिक सांपडले. मनुष्याचें वय वाढत जातें तसतशीं पुस्तकें विकत घेऊन तीं संग्रह करण्याची त्याची प्रवृत्ति होते.

---

### तागाच्या लागवडीचा अंदाज

हिंदुस्थानांत तागाची लागवड मुख्यतः बंगालमध्यें होते हें सुप्रसिद्धच आहे. त्याचे खालोखाल आसाम, बिहार व ओरिसा हे प्रांत आणि कचबिहार व त्रिपुरा हीं संस्थानें येतात. १९४६–४७ मधील लागवडीच्या अंदाजाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | अंदाजी लागवड ( एकर ) |
|---|---|
| बंगाल | २०,१०,००० |
| आसाम | १,७४,००० |
| बिहार | १,४५,००० |
| ओरिसा | ६०,००० |
| कुचबिहार | ६०,००० |
| त्रिपुरा | ६०,००० |
| | २५,०९,००० |

---


### दि पूना मर्चंटस को–ऑपरेटिव्ह बँक, लि. पुणें

## नोटीस

या बँकेच्या सर्व समासदांस कळविण्यांत येतें कीं, दि. ११ ऑगस्ट १९४६ ला बोलाविलेल्या वार्षिक साधारण सभेची नोटीस व प्रतिवर्षाप्रमाणें अहवाल वगैरे कागद आपणाकडे अधिकृतरीत्या पोस्टानें पाठविलेले आहेत. परंतु पोस्ट खात्यांत चालू असलेल्या संपामुळें कदाचित् हें टपाल आपणांस घरपोंच होणार नाहीं, तरी आपण समक्ष पोस्टांत जाऊन घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

या अपरिहार्य अडचणीमुळें ही जाहीर विनंती केली आहे, कळावें.

पुणें
२५ जुलै १९४६

आपला,
म. ग. साबणे, एजंट.



तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**विजेच्या यंत्रसामुग्रीच्या धंद्यास संरक्षण द्या**—विजेच्या यंत्रसामुग्रीचें उत्पादन हिंदुस्थानांत वाढत चाललें आहे. युद्धापूर्वी १०० विजेच्या मोटारी तयार झाल्या तर १९४५ सालीं त्यांची संख्या ३०,००० झाली. डिस्ट्रिब्यूशन ट्रॅन्स्फॉर्मर्सचें उत्पादन ६० चें १५,००० झालें. २५ अश्वशक्तीपर्यंतच्या मोटारी आणि २५० के. व्ही. ए. पर्यंतचे ट्रॅन्स्फॉर्मर्स हिंदुस्थानापुरते बनविण्यास हिंदी कारखानदार आतां समर्थ आहेत. परंतु त्यांना विदेशी कंपन्यांकडून भरमसाट किंमतीनें कांहीं कच्चा माल विकत घ्यावा लागतो. ग्रेट ब्रिटनमध्यें ज्या भावानें तांबें विकलें जातें त्या भावानें तें हिंदी कारखानदारास उपलब्ध नाहीं. आयात तयार मालावर १०% जकात बसविलेली आहे, ती हिंदी धंद्याचें संरक्षण करण्यास अपुरी आहे. तेव्हां त्याचें प्रभावी संरक्षण व्हावें व युद्धोत्तर औद्योगिक योजनांत विजेच्या यंत्रसामुग्रीच्या धंद्यास प्राधान्य मिळावें अशी सूचना अ. भा. का. संघानें, मध्यवर्ती सरकारास केली आहे. औद्योगीकरणाच्या दृष्टीनें विजेच्या व विद्युत् यंत्राच्या वापराच्या प्रसाराचें महत्त्व विशेष असल्याकारणानें संघाच्या सूचनेचें महत्त्व विशेष आहे.

**बहुपत्नीत्वास कायद्यानें बंदी होणार**—एखाद्या हिंदूनें आपली पत्नी जिवंत असतांना पुनः विवाह केला, तर हा विवाह बेकायदा ठरविणारें एक बिल मुंबई सरकारनें तयार केलें आहे. अशा तऱ्हेचा विवाह मुंबई प्रांतांत होण्यास बंदी केली जाईल. आणि विवाहबद्ध होणारांपैकीं एकजण ह्या प्रांताचा रहिवासी असून त्यानें प्रांताबाहेर जाऊन विवाह केला तर तो विवाह बेकायदा ठरेल. " हिंदु " ह्या व्याख्येंत शीख, जैन, आर्यसमाजी व ब्राह्मो ह्यांचा समावेश होणार आहे.

**खराब अमेरिकन बिस्किटांची विक्री**—अमेरिकेच्या लष्करी खात्यानें हिंदुस्थानांत जादा झालेलीं आपलीं बिस्किटें सुमारें ३ लक्ष रुपयांस कराची येथें विकलीं. तीं बाजारांत आलीं तेव्हां खाण्यास लायक नसल्याचें आढळलें. कराची म्युनिसिपल आरोग्याधिकाऱ्यांनीं बराच साठा जप्त केला आहे, व्यापाऱ्यांस हीं बिस्किटें पुड्यास एक आणा दरानें पडलीं तीं सहा ते आठ आणे दरानें विकण्यांत येत होतीं.

**मालाच्या आयातीस परवाने**—मालाच्या आयातीस परवाने आतां मुक्त हस्तानें देण्यांत येतील असें हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

**मुदत वाढवा**—विक्रीकराबाबत व्यापाऱ्यांनीं आपलीं नांवें नोंदण्याची तारीख एक पंधरवड्यानें पुढें ढकलून ती १५ ऑगष्ट करण्यांत यावी, असें मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरनें सुचविलें आहे.

**बँक ऑफ इंडियाची सोलापूर शाखा**—बँक ऑफ इंडिया सोलापूर येथें लवकरच एक शाखा उघडणार आहे.

**हिंदुस्थानचें सयामला कर्ज**—हिंदुस्थान सरकारनें सयामला २० वर्षें मुदतीचें ३%दराचें ५ कोटि रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. सयामचा तांदूळ हिंदुस्थानास हवा आहे. त्यासाठीं त्या देशाची स्थिति लवकर सुधारणें हिंदुस्थानच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. हिंदुस्थानांत शिलक पडलेला युद्धपुरवठ्याचा माल ह्या कर्जामुळें सयामला विकत घेतां येणें शक्य होईल.

**इं. बँकेच्या बंगालमधील कचेऱ्यांत संप**—इंपीरिअल बँकेच्या बंगाल सर्कलमधील कचेऱ्यांतील नोकर १ ऑगस्टपासून संपावर जाणार आहेत. २०० शाखांतील २,५०० नोकर या संपांत सामील होतील. बंगाल सर्कलची व्याप्ति रंगून ते श्रीनगर इतकी मोठी आहे.


**टाटांच्या शेअर्सवरील डिव्हिडंड जाहीर झालें**

(३१ मार्च १९४६ अखेरच्या वर्षाचें)

| | |
|---|---|
| पहिला प्रेफरन्स– | ९ रु (वजा इनकमटॅक्स) |
| दुसरा प्रेफरन्स– | ७ रु. ८ आ. („ „) |
| ऑर्डिनरी | २३ रु. |
| डिफर्ड | १२९ रु. ८ आ. ९ पै. |

**हिंदुस्थानांत बाहेरून २० लक्ष टन धान्य येण्याची आवश्यकता**–हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर दुष्काळ टाळावयाचा असेल तर त्या देशास १९४६ च्या दुसऱ्या सहामाहींत २० लक्ष टन धान्य आयात करतां आलें पाहिजे आणि त्यांपैकीं ७ ½ लक्ष टन धान्य अमेरिकेनें दिलें पाहिजे, अशी येथें नुकत्याच येऊन गेलेल्या अमेरिकेच्या दुष्काळ चौकशी मंडळानें अमेरिकन सरकारास शिफारस केली आहे.


**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

**पैसा व ज्ञान मिळवा !**

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा। किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल। किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ।

मेसर्स—**विपट आणि मंडळी,**

पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.

१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पुना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत:




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.